जा.क्र.का.15/वामुदत 2021-22/366
मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1
दिनांक 31/03/2021.

**आदेश**

विषय :- सन 2021-22 करीताचे वार्षिक बाजारमूल्य दर तक्ते व मुल्यांकनाच्या मार्गदर्शक सूचना न बदलण्याबाबत तथा कायम ठेवण्याबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन,महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील पत्र क्र.मुद्रांक-2021/प्र.क्र.110/म-1(धोरण), दि.31/03/2021.

ज्याअर्थी, महाराष्ट्र मुद्रांक (मालमतेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम 1995 च्या नियम क्र.4 (3) अन्वये प्रतीवर्षी एप्रिल महिन्याच्या 1 तारखेस महाराष्ट्र राज्यातील सर्व भौगोलिक क्षेत्रासाठी स्थावर मालमत्तेचे वार्षिक दर तक्ते निर्गमित करण्यात येतात.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम 1995 च्या नियम 4 च्या उप-नियम क्र.(9) मधील तरतूदी अन्वये शासनाने संदर्भित पत्रान्वये निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी, संदर्भित पत्रान्वये दिलेले शासनाचे निर्देश विचारात घेऊन सन 2021-22 या आर्थिक वर्षाकरीता, दि.12/09/2020 पासून अंमलात असलेले सन 2020-21 चे वार्षिक दर तक्ते, मूल्यांकन मार्गदर्शक सूचना व नविन बांधकाम दर संपूर्ण राज्यासाठी कायम ठेवणेत येत आहेत.

सदरचे वार्षिक दर तक्ते नोंदणी विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर online services या सदराखाली eASR या ठिकाणी Process येथे उपलब्ध राहतील.

स्वाक्षरी/--
( श्रावण हर्डिकर )
मुख्य नियंत्रक महसूली प्राधिकारी तथा
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर:-

1) मा.अपर मुख्य सचिव,महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी विभाग, मंत्रालय मुंबई - 32 सादर.
2) मा.महालेखापाल,(लेखापरिक्षा)-II, नागपूर.

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.

1) अप्पर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.
2) वरिष्ठ तांत्रिक संचालक, एन.आय.सी. पुणे.
3) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

E:\technical\ASR 2021-22-ASR ORDER

4) सहसंचालक, नगर रचना, मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे माहिती व कार्यवाहीसाठी.
5) उपसंचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश मूल्यांकन मुंबई.
6) सहायक संचालक, नगर रचना, मूल्यांकन, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (मुख्यालय), पुणे.
8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक), पुणे.
सदर आदेश या विभागाच्या संकेतस्थळावर Upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.
9) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, मुंबई / कोकण / पुणे / नाशिक/ औरंगाबाद / लातूर / अमरावती / नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
-/ सदर आदेशाबाबत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना तात्काळ अवगत करण्यात यावे. तसेच सदर आदेश त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & Acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.
10) सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई-32.
11) प्रशासकीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक,मुंबई शहर / मुंबई उपनगर जिल्हा.
12) सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी / सह जिल्हा निबंधक.
सह जिल्हा निबंधक यांनी आपल्या अधिनस्थ असलेल्या सर्व दुय्यम निबंधकांना सदर आदेशाबाबत तात्काळ अवगत करावे.

निर्गमित

(मसुदा मा.नोंदणी महानिरीक्षक यांनी मंजूर केला असे)

( विजयकुमार गोस्वामी )
सहसंचालक,नगर रचना,
मूल्यांकन,महाराष्ट्र राज्य,पुणे.